# महसुल मार्फत करणेत येणारी शासकिय वसुली

महसुल प्रशासनाचा मुख्य उद्येश हा वसुली आहे महसुल मार्फत विविध प्रकारचे वसुली केल्या जातात व प्रत्येक प्रकारची वसुली आकारणी रित ही वेगवेगळी आहे प्रत्येक वसुली ही वेगवेगळया लेखाशीर्षखाली शासनाकडे जमा केली जाते या लेखामध्ये आपण वसुलीचे प्रकार, आकरणी कशी करावयाची, याबाबत सविस्तर माहिती पाहणार आहोत.

**महसुल प्रशासनामार्फत अ, ब व क अशा तीन गटांत करांची वसुली केली जाते .**

- "**अ**" गटात जमीन महसूल कर, जिल्हा परिषद उपकर, ग्रामपंचायत उपकर, वाढीव जमीन कर, शिक्षण कर, रोजगार हमी आदींचा समावेश होतो .
- "**ब**" गटात गौण खनिज व करमणूक कर; तर
- "**क**" गटात संजय गांधी निराधार योजना, नैसर्गिक आपत्ती व तगाई आदींचा समावेश आहे.

**आपण यालेखामध्ये फक्त अ गटातील वसुली बाबत माहिती पाहणार आहोत**

## जमीन महसुल :-

**शासकिय व्याख्या महराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 2(19) मध्ये दिली आहे.**

जमीनीचे आकरणी वर जो कर अवलंबुन असतो त्या करास आपण सर्वसाधारणपणे जमिन महसुल म्हणतो.यामध्ये **मुळ जमीन महसुल, जिल्हा परिषद उपकर व ग्रामपंचायत उपकर** या तीन बाबींचा समावेश होतो.या तीन बाबींची बेरीज करून जी एकत्रित रक्कम तयार होते तितकी वसुली संबधित खातेदाराकडुन जमिनबाब वसुल म्हणुन करतात

## जमिन महसुल ठरविणे

जमिन महसुल हा खातेदार यांचे नावावर असलेले एकुण क्षेत्राचे आकरावर काढला जात असलेने. **या प्रकारात खातेदाराचे धारण जमिन नोंदवही म्हणजेच गाव नमुना नं 8 अ ला महत्व आहे.**

- तलाठी यांनी पुर्ण गावाचे आठ अ नमुना अद्यावत करून घ्यावा.**(१ डिसेंबर रोजी)**
- ज्या खातेदारांचा आठ अ प्रमाणे आकार 5.00 रू व किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा खातेदारांची यादी करावी. क्षेत्राचा यामध्ये संबंध येत नाही फक्त आकार पहावा
- ज्या खातेदारांचा आकार 5.00 रु पेक्षा कमी आहे असे खातेदार वसुलीस अपात्र समजावे व त्या खातेदारांचीही यादी करावी व ती माहिस्तव ठेवावी गाव नमुना नं 8 ब करताना या माहितीचा वापर करावा.
- खातेदाराचा जमिनबाब वसुल ठरविताना जमिन मुळ आकार जिल्हा परिषद सेस व ग्रामचंपायत सेस या तीन बाबी त्यामध्ये सामाविष्ट करावे लागत असलेने या बाबी खालीलप्रमाणे ठरविणेत यावेत
- **जमिन मुळ आकार** :- हा गाव नमुना आठ अ वरून तयार केलेल्या वसुलीस पात्र असणारे खातेदार यांचा एकत्र आकार असतो तो जसाचे तसा घ्यावा
- **जिल्हा परिषद सेस** :- हा सेस मुळ आकाराचे 7 पट असतो त्यामुळे मुळ आकरास 7 पट करून हा आकार काढावा
- **ग्रामपंचायत सेस**:- हा सेस मुळ आकराइतकाच असतो त्यामुळे याठिकाणी मुळ आकार नमुद करावा

- ❖ **एकुण जमिन बाब** :- वरील तीन बाबींची बेरीज केलेस येणारी रक्कम हा खातेदाराचा एकुण जमिन बाब असतो ही रक्कम मुळ आकराचे 9 पट असते
- ✓ **उदा. एका खातेदाराचे आठ अ प्रमाणे क्षेत्र 7.25 हेक्टर असुन या खातेदाराचा एकुण क्षेत्राचा आकार 5.60 रु पै आहे तर या खातेदाराचा जमिन महसुल वसुली किती ?**

खातेदाराचे जमिन बाब खालीलाप्रमाणे येईल

- ✓ **जमिन मुळ आकार :- 5.60 रु पै**
- ✓ **जिल्हा परिषद सेस :- 5.60 x 7 = 39.20 रु पै**
- ✓ **ग्रामपंचायत सेस :- 5.60 रु पै**
- ✓ **एकुण जमिन बाब :- 5.60+39.20+5.60=50.40 रु पै**

या प्रमाणे खातेदाराची एकुण जमिन बाब वसुली **50.40 रु पै इतकी असेल.**

**टिप:- या प्रमाणे वसुली पावती करताना आपण पावतीनुसार बेरीज करावी व चलन करताना पुर्णांक मध्ये करावे लागते त्यामुळे पुर्णांक साठी कमी पडणारी रक्कम शेवटची पावती करताना मुळ आकार मध्ये वाढावावी व रक्कम पुर्णांक करून घ्यावी प्रत्येक खातेदाराची रक्कम पुर्णांक करू नये.**

## अकृषिक जमिन महसुल :-

**वरील प्रमाणेच अकृषिक आकरणी ही केली जाते त्यामध्ये मुळ आकाराऐवजी अकृषिक आकार असतो व वरीलप्रमाणेच जिल्हा परिषद व ग्रामपंचायत सेस असतात.**

## कायदेशीर तरतुदी :-

**अधिक माहितीसाठी वाचावे**

- ➢ **महाराष्ट्र जमिन महसुल नियम पुस्तिका खंड 4**
- ➢ **महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 127**
- ➢ **महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 144 ते 155**

## वाढीव जमिन महसुल :-

जमिन महसुलाबरोबरच आपणाला वाढीव जमिन महसुल ही वसुल करावा लागतो महाराष्ट्रात राबविणेत येणारी रोजगार हमी योजना अधिक प्रभावी पणे राबविणेकामी या प्रकारचा वसुल महराष्ट्रात 1 ऑगस्ट 1975 पासुन आकरणी करणेस सुरूवात झाली.

**<u>महाराष्ट्र वाढीव जमिन महसुल व विशेष आकरणी अधिनियम 1974</u>** अन्वये खालीलप्रमाणे वाढीव जमिन महसुल आकरणी करणेची तरतुद आहे

| खातेदाराचे क्षेत्र | वाढीव जमिन महसुल |
|---|---|
| 8.00 हेक्टर व त्यापेक्षा जास्त परंतू 12.00 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असेल तर | जमिन महसुल आकाराचे 50% रक्कम |
| 12.00 हेक्टर व त्यापेक्षा जास्त | जमिन महसुल आकाराचे 100% रक्कम |

**टिप :- अकृषिक जमिनीलाही वरीलप्रमाणे वाढीव जमिन महसुल आकरावा**

**उदा एका खातेदाराचे क्षेत्र 8.62 हे असुन त्याचा जमिन महसुल आकार 9.60 रु पै आहे तर त्या खातेदाराचे एकुण वसुली किती**

**सुरूवातीला आपण जमिन बाब वसुल काढु**

- ✓ **मुळ आकार:- 9.60**
- ✓ **जि प सेस :- 9.60 X 7 = 67.20**
- ✓ **ग्रा.प सेस :- 9.60**
- ✓ **एकुण :- 9.60+67.20+9.60=86.40 रु पै**

**आता खातेदाराचा वाढीव जमिन महसुल**

**8 हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र असलेने मुळ आकराचे 100 % म्हणजेच 9.60 रु पै इतका वाढीव जमिन महसुल येईल**

**खातेदाराचा एकुण वसुल = 86.40+9.60=96.00 रु.पै**

**टिप:- जमिन महसुल व वाढीव जमिन महसुल यांचे लेखाशीर्ष वेगवेगळे असलेने पावती पुस्तके वेगवेगळी असावीत व पावत्या ही वेगवेगळया करावे लागतात**

## कायदेशीर तरतूद :- <u>महाराष्ट्र वाढीव जमिन महसुल व विशेष आकरणी अधिनियम 1974</u>

## शिक्षणकर :-

नगदी पिकांवर जो कर शासनामार्फत आकारला जातो त्या करास शिक्षणकर असे म्हणतात **महाराष्ट्र शिक्षणकर व रोजगार हमी कर अधिनियम १९६२** मधील तरतुदीनुसार तो खालीलप्रमाणे आकारणेत येतो

| अ न | पिकाचे नाव | प्रति हेक्टर दर रु |
|---|---|---|
| १ | बारमाही पाण्यावरील ऊस | १९० |
| २ | इतर जमिनीवरील ऊस | ११० |
| ३ | बागायत कापूस | ४० |
| ४ | एच ४ कॉटन सीड | ४० |
| ५ | हायब्रीड ज्वारी सीड | ४० |
| ६ | हायब्रीड मका सीड | ४० |
| ७ | हायब्रीड बाजरी सीड | ४० |
| ८ | बागायती भुईमुग | ४० |
| ९ | लिंबू वर्गीय फळे | ८० |
| १० | केळी | ११० |
| ११ | द्राक्षे | ३८० |
| १२ | चिक्कू | ८० |
| १३ | हळद | ८० |
| १४ | तंबाखू बागायत | १३० |

## वाढीव शिक्षणकर

**महाराष्ट्र वाढीव जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम १९७४ नुसार खालीलप्रमाणे वाढीव शिक्षण कर आकारणी करतात**

| अ न | शिक्षणकर रक्कम | वसूल करावयाचा वाढीव शिक्षणकर |
|---|---|---|
| १ | २०० रु पेक्षा जास्त व ५०० रु पेक्षा कमी | २०० रु नंतर येणारे रक्कम चे २५ % |
| २ | ५०० रु पेक्षा जास्त व १००० रु पेक्षा कमी | रु ७५ + ( ५०० रु नंतर येणारे रक्कम चे ५०%) |
| ३ | १००० रु पेक्षा जास्त व २००० रु पेक्षा कमी | रु ३२५ + ( १००० रु नंतर येणारे रक्कम चे १००%) |
| ४ | २००० रु व त्यापेक्षा जास्त | रु १३२५ + (२००० रु नंतर येणारे रक्कम चे १५०%) |

## रोजगारहमी कर

**हा कर वरील अधिनियामाप्रमाणेच आकारला जातो खातेदाराचे एकूण बागायत क्षेत्र यांची यादी करावी प्रत्येक खातेदारास ०.४० हेक्टर ची सुट देणेत येते व उर्वरित क्षेत्रावर प्रति हेक्टरी २५ रु या दराने रक्कम आकारणी केली जाते**

**२४-०८-२०१५** **मोहसिन शेख, तलाठी- ता.कर्जत ९७६६३६६३६३**